# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२५ / अग्रहायण १७, १९४७ (शके)

११४ मा.सदस्यांच्या सभागृहातील उपस्थिती संदर्भात महाराष्ट्र विधानपरिषद नियम यामध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे :-

**नियम २७८ :** "सचिव एक हजेरीपट ठेवतील व (सभापती, उप सभापती आणि मंत्री यांच्या व्यतिरिक्त) हजर असलेले सदस्य त्यात दररोज सही करतील (सभापती, उप सभापती किंवा मंत्री यांच्या व्यतिरिक्त) ज्या कोणत्या सदस्याने, कोणत्याही दिवशी हजेरीपटात सही केली नसेल त्या दिवशी तो विधानपरिषदेत अनुपस्थित असल्याचे गृहीत धरण्यात येईल."

**प्रचलित प्रथेनुसार मा.सदस्य विधानपरिषदेच्या बैठकीस उपस्थित असून देखील एखाद्या कारणास्तव हजेरी पटावर सही करावयाचे त्यांच्याकडून अनावधानाने राहून गेले असल्यास अशा मा.सदस्यांनी त्याबाबत विधानमंडळ सचिवालयास त्याच दिवशी किंवा उशीरात उशीर दुसऱ्या दिवशी कळविणे आवश्यक असल्याचे मा.सदस्यांना वेळोवेळी पत्रक भाग दोन द्वारे कळविण्यात आले आहे.**

तथापि, असे निदर्शनास आले आहे की, विधानपरिषद सभागृहाच्या बैठकीस उपस्थित असूनही सही करण्याचे राहून गेले असल्यास, याबाबत बऱ्याचशा मा.सदस्यांकडून दोन दिवसानंतर किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीनंतर लेखी पत्र देऊन या सचिवालयास कळविले जाते. त्यामुळे त्या मा.सदस्यांच्या अधिवेशनाच्या बैठकीची देयके मंजूर करताना अडचणी निर्माण होतात तसेच याबाबतीत महालेखाकार, भारत सरकार यांचेकडून लेखा आक्षेप येण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

सबब, निदेशानुसार सर्व मा.सदस्यांना कळविण्यात येते की, मा.सदस्यांनी त्यांच्या विधानपरिषद बैठकीच्या अनुपस्थितीची सूचना कारण नमूद करुन त्याच दिवशी अथवा उशिरात उशीरा दुसऱ्या दिवशी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्याकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. अशा प्रकारची सूचना उपरोक्त नमूद कालावधीत न दिल्यास त्या दिवसाची त्यांची उपस्थिती ग्राह्य धरता येणार नाही. कृपया मा.सदस्यांनी याबाबतची नोंद घेऊन या सचिवालयास सहकार्य करावे.

**विधान भवन,**
नागपूर,
**दिनांक ८ डिसेंबर,२०२५**

**डॉ.विलास आठवले**
सचिव (३)
महाराष्ट्र विधानपरिषद

<u>**याची प्रत :-**</u>

१. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. मा.सभापती व मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव व खाजगी सचिव **तथा जनसंपर्क अधिकारी**
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
४. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
५. संगणक कक्ष (Website) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.